11 APR

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजीराव देशमुख : शिवाजी विद्यापीठात फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहास प्रारंभ

# पंजाबराव देशमुख यांच्या कार्याचे चिंतन व्हावे

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कृषीमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या विचारकार्याविषयी सखोल संशोधन व चिंतन होण्याची गरज आहे, अशी अपेक्षा पुणे येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे संचालक तथा माजी कृषी व फलोत्पादन सचिव शिवाजीराव देशमुख यांनी सोमवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहास प्रारंभ करण्यात आला. पहिल्या दिवशी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'भारतातील शेतीच्या समस्या' या विषयावरील उद्घाटनाच्या परिसंवादात पाहुणे म्हणून ते बोलत होते. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

देशमुख म्हणाले, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यावर राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा मोठा पगडा होता. १९१७ साली खामगाव येथे झालेल्या परिषदेत महाराजांचे विचार त्यांनी ऐकले होते. त्या विचारांचा मोठा पगडा त्यांच्या मनावर होता. अमरावतीत शिवाजी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक कार्यास प्रारंभ केला. शेतकऱ्यांच्या हिताची काळजी वाहणाऱ्या भारत कृषक समाजाची स्थापनाही केली. विद्यापीठांनी डॉ. देशमुखांच्या कार्याविषयी सखोल संशोधन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी पर्यावरण स्वच्छ व शुद्ध राखण्याची जबाबदारी आपणावर आहे असे सांगितले. अध्यक्षीय मनोगतात डॉ. शिर्के यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्याविषयी संशोधन करण्यासाठी विविध अधिविभागांनी एकत्र यावे असे आवाहन केले. यावेळी धारवाड येथील कर्नाटक विद्यापीठाचे अर्थतज्ज्ञ डॉ. एस. टी. बागलकोटी, डॉ. प्रकाश कांबळे डॉ. नितीन माळी, डी. श्रीकांतउपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाच्या उद्घाटनपर परिसंवादात शिवाजीराव देशमुख यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. एस.टी. बागलकोटी, डॉ. पी.एस. पाटील, कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. श्रीकृष्ण महाजन उपस्थित होते.

## आज विशेष परिसंवाद

सप्ताहात आज, मंगळवारी महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त 'फुले आंबेडकरांची भारतविषयक संकल्पना' या विषयावरील परिसंवादात डॉ. भारती पाटील, डॉ. अरुण शिंदे, टेकचंद सोनवणे सहभागी होणार आहेत.

# पंजाबराव देशमुख यांच्या कार्याविषयी सखोल संशोधनाची गरज

## शिवाजीराव देशमुख; विद्यापीठात फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहास प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कृषिमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या विचारकार्याविषयी सखोल संशोधन व चिंतन होण्याची गरज आहे, अशी अपेक्षा पुणे येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे संचालक शिवाजीराव देशमुख यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठ डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे फुले-शाहू-आंबेडकर सप्ताह उद्घाटन समारंभ मानव्यशास्त्र सभागृहात झाला. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'भारतातील शेतीच्या समस्या' या विषयावरील परिसंवादात ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. देशमुख म्हणाले, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यावर राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा मोठा पगडा होता. त्यांच्या विचारकार्याचा वारसा त्यांनी आयुष्यभर जपला. मजुरांची अनुपलब्धता, खते, बियाणांच्या बाबतीत शेतकऱ्यांची होणारी फसवणूक, न परवडणारी जिरायती शेती व राज्याचा अवर्षणग्रस्त राहणारा ४० टक्के भूभाग या महाराष्ट्रातील शेतीसमोरील सर्वसाधारण समस्या आहेत.

त्यासाठी उपलब्ध पाणी योग्यप्रकारे साठवून त्याचा नियोजनबद्ध वापर करणे, केवळ शेतीवरील अवलंबित्व कमी करून शेतीपूरक अथवा अन्य व्यवसायांची त्याला जोड देणे आवश्यक आहे. अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्याविषयी संशोधनासाठी विद्यापीठातील विविध अधिविभागांनी एकत्र येऊन काम करावे. यावेळी अर्थतज्ज्ञ डॉ. एस. टी. बागलकोटी, अर्थतज्ज्ञ डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. नितीन माळी, डी. श्रीकांत, वसंत लिंगनूरकर, आनंद खामकर उपस्थित होते. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दीपा श्रावस्ती यांनी आभार मानले. मंगळवारी महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त 'फुले-आंबेडकरांची भारतविषयक संकल्पना' या विषयावर परिसंवाद होणार आहे. डॉ. भारती पाटील, डॉ. अरुण शिंदे, टेकचंद सोनवणे मार्गदर्शन करणार आहेत.



**कोल्हापूर : विद्यापीठात फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाच्या उद्घाटनपर परिसंवादात बोलताना शिवाजीराव देशमुख. शेजारी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन आदी.**

### पाली भाषा, आरक्षणविषयक अभ्यासक्रमांना मान्यता

विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर केंद्राच्या पाली भाषा व आरक्षणाचे संविधानात्मक धोरण या दोन विषयांवरील प्रत्येकी तीन महिन्यांच्या दोन अभ्यासक्रमांना व्यवस्थापन परिषदेची मान्यता प्राप्त झाल्याची माहिती संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी यावेळी दिली.

11 APR 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पंजाबराव देशमुख यांच्या कार्याविषयी सखोल संशोधनाची गरज

## शिवाजीराव देशमुख : शिवाजी विद्यापीठात फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहास प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कृषिमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या विचारकार्याविषयी सखोल संशोधन व चिंतन होण्याची गरज आहे, अशी अपेक्षा पुणे येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे संचालक तथा माजी कृषी व फलोत्पादन सचिव शिवाजीराव देशमुख यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे सोमवारपासून फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहास प्रारंभ करण्यात आला. सप्ताहाच्या पहिल्या दिवशी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'भारतातील शेतीच्या समस्या' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. या परिसंवादाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाच्या उद्घाटनपर परिसंवादात बोलताना शिवाजीराव देशमुख. सोबत डॉ. एस. टी. बागलकोटी, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आदी.**

देशमुख म्हणाले, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यावर राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा मोठा पगडा होता. १९१७ साली खामगाव येथे झालेल्या परिषदेत शाहू महाराजांचे विचार त्यांनी ऐकले होते. त्या विचारांचा मोठा पगडा त्यांच्या मनावर होता. अमरावतीत शिवाजी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी शैक्षणिक कार्यास प्रारंभ केला. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्या हिताची काळजी वाहणाऱ्या भारत कृषक समाजाची स्थापनाही केली. विद्यापीठांनी डॉ. देशमुखांच्या कार्याविषयी सखोल संशोधन करावे.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, हवामान बदल आणि जागतिक तापमान वाढ याच्यामुळे समग्र पर्यावरण बदलून गेले आहे. त्याचा शेतीसह मानवाच्या जीवनमानावर विपरीत परिणाम दिसून येत आहे. त्यामुळे आपल्या सर्वंकष ज्ञानाच्या आधारे शाश्वत विकास आणि फिरते अर्थकारण याचा जास्तीत जास्त वापर करून आपले पर्यावरण स्वच्छ व शुद्ध राखण्याची जबाबदारी आपणावर आहे.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, फुले-शाहू-आंबेडकर आणि डॉ. देशमुख या नेत्यांच्या विचारकार्याचा एकत्रित विचार केला जाणे आवश्यक आहे. तसे झाल्यासच त्यांच्यातील सर्वंकष सहमतीचे आणि व्यापक सामाजिक न्यायाच्या धोरणाचे स्वरूप आपल्यासमोर उभे राहील. यावेळी धारवाड येथील कर्नाटक विद्यापीठाचे अर्थतज्ज्ञ डॉ. एस. टी. बागलकोटी, अर्थतज्ज्ञ डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. नितीन माळी, डी. श्रीकांत, वसंत लिंगनूरकर, आनंद खामकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. आंबेडकर केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. दीपा श्रावस्ती यांनी आभार मानले.

### पाली भाषा व आरक्षणविषयक अभ्यासक्रमांना मान्यता

विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर केंद्राच्या पाली भाषा आणि आरक्षणाचे संविधानात्मक धोरण या दोन विषयांवरील प्रत्येकी तीन महिन्यांच्या दोन अभ्यासक्रमांना व्यवस्थापन परिषदेची मान्यता प्राप्त झाल्याची माहिती संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी यावेळी दिली.

11 APR 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पंजाबराव देशमुखांच्या कार्याविषयी संशोधन करावे

## शिवाजीराव देशमुख; शिवाजी विद्यापीठात फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहास प्रारंभ

कोल्हापूर, ता. १० : 'कृषिमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यावर राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा मोठा पगडा होता. त्यांनी अमरावतीत शिवाजी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक कार्यास प्रारंभ केला. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्या हिताची काळजी वाहणाऱ्या भारत कृषक समाजाची स्थापनाही केली. विद्यापीठांनी डॉ. देशमुखांच्या कार्याविषयी सखोल संशोधन करावे,' असे आवाहन पुणे येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे संचालक शिवाजीराव देशमुख यांनी सोमवारी येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे आयोजित फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहातील या कार्यक्रमात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित 'भारतातील शेतीच्या समस्या' या विषयावरील परिसंवादाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्याविषयी संशोधन करण्यासाठी विद्यापीठातील विविध अधिविभागांनी एकत्र येऊन स्वरुप ठरवून त्या अनुषंगाने पुढे जावे.'

या कार्यक्रमास अर्थतज्ज्ञ डॉ. एस.टी. बागलकोटी, डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. नितीन माळी, डी. श्रीकांत, वसंत लिंगनूरकर, आनंद खामकर, आदी उपस्थित होते. डॉ. आंबेडकर केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दीपा श्रावस्ती यांनी आभार मानले.

### शेतीचे प्रश्न सोडविण्यासाठी बाह्य तज्ज्ञ व्यवस्थांनी पुढे यावे

▪ देशमुख म्हणाले, 'शेती हा अतिव्यापक विषय आहे. मजुरांची अनुपलब्धता, खते, बियाणे आदींच्या बाबतीत शेतकऱ्यांची होणारी फसवणूक, न परवडणारी जिरायती शेती आणि राज्याचा अवर्षणग्रस्त राहणारा ४० टक्के भूभाग या महाराष्ट्रातील शेतीसमोरील सर्वसाधारण प्रश्न आहेत. शेतीला पर्याय काढल्याखेरीज हे प्रश्न सुटणारे नाहीत. हे प्रश्न केवळ शेतकऱ्यांकडून सुटणारे नसून त्यांना सोडविण्यासाठी बाह्य तज्ज्ञ व्यवस्थांनीच पुढे यायला हवे.'

### पाली भाषा अभ्यासक्रमाला मान्यता

विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर केंद्राच्या पाली भाषा आणि आरक्षणाचे संविधानात्मक धोरण या दोन विषयांवरील प्रत्येकी तीन महिन्यांच्या दोन अभ्यासक्रमांना व्यवस्थापन परिषदेची मान्यता प्राप्त झाल्याची माहिती संचालक डॉ. महाजन यांनी दिली.



**कोल्हापूर : शिवाजीराव देशमुख यांनी मार्गदर्शन केले.**

पुढारी

# कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ विधी अधिविभागातील विद्यार्थ्यांनी ग्रुप ग्रामपंचायत रायगडवाडी वाघेरी येथे ग्रामीण जनजीवन व त्यांच्या कायदेविषयक अडचणी जाणून घेतल्या. विद्यार्थ्यांनी त्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी विधी अधिविभाग प्रमुख डॉ. विवेक यशवंत धुपदाळे होते.

यावेळी ॲड. सत्यशीला दळवी, ॲड. देवदास चौगले यांनी मार्गदर्शन केले. ॲड. प्रियांका गुरव व सहकाऱ्यांनी व्यसनमुक्तीपर 'हम सब एक है' पथनाट्य सादर केले.

11 APR 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महात्मा फुले यांचे विचार वर्तमानातही आवश्यक

## मान्यवरांचे मत; शेतकरी आणि बहुजन समाजासाठी केले दिशादर्शक काम



**जोतिबा फुले जयंती**

कोल्हापूर, ता. १० : ब्रिटिशांच्या राजवटीत समाजातील विविध प्रथांविरोधात जोरदार आवाज उठवला तो महात्मा जोतिबा फुले यांनी. स्त्री शिक्षण, विधवा विवाह, पुनर्विवाह, बालविवाह आदी विषयांवर त्यांनी समाजाला जागे करण्याचे काम केले. एकूणच सामाजिक परिवर्तनाच्या लढाईत त्यांनी शिक्षणाचा आग्रह धरला. मुलींची पहिली शाळा त्यांनी सुरू केली. फुले यांच्या कामाची ही यादी संपता संपणार नाही. त्यांच्या उद्या (मंगळवारी) होणाऱ्या जयंतीनिमित्त या क्षेत्रातील मान्यवरांशी संवाद साधल्यानंतर सर्वच क्षेत्रात आजही महात्मा फुले यांचे विचार प्रस्तुत असल्याच्या भावना व्यक्त झाल्या.

### महात्मा फुलेंचे विचार आजही प्रस्तुत

महात्मा फुले यांच्यानंतर पंचवीसहून अधिक वर्षे सत्यशोधक चळवळीचे काम थांबले. मात्र, राजर्षी शाहू महाराजांच्या पुढाकाराने करवीर संस्थानांबरोबरच संस्थानाबाहेरही या कामाला पाठबळ मिळाले. सत्यशोधक विचार रुजवणाऱ्या कार्यकर्त्यांची मोठी फळी निर्माण झाली. शेतकऱ्यांच्या वेदना त्यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' मधून मांडल्या. त्या आजही कायम आहेत. महिलांबाबतचे प्रश्न असोत किंवा शिक्षणातील विविध प्रश्नांबाबतही फुले यांनी परखडपणे विचार मांडले. केवळ महिला, शिक्षण, शेतीच नव्हे तर सर्वच क्षेत्रासाठी त्यांचे विचार आजही प्रस्तुत आहेत.

**-डॉ. नंदकुमार मोरे,**
मराठी विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ

### माणसाचा धर्म एकच असावा...

'ख्रिस्त, महंमद, मांग, ब्राम्हणाशी, धरावे पोटाशी बंधूपरी' असा एकमय राष्ट्रनिर्मितीचा कैवार महात्मा फुले यांनी घेतला आणि सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी आयुष्य खर्ची घातले. पण, सद्यस्थिती काय आहे. विविध जाती-धर्मांमध्ये जाणीवपूर्वक तेढ निर्माण केली जात आहे. मुळात आपण कुठल्या जाती-धर्मात जन्माला आलो तरी घराचा उंबरा ओलांडला की आपण फक्त आणि फक्त भारतीयच असायला हवे. निर्मिकाने निर्माण केलेली पृथ्वी एकच आहे. ती साऱ्यांचा भार वाहते. एक पृथ्वी सर्वांना सुखी ठेवू शकते. मग, धर्म तरी वेगवेगळे कशासाठी? हा त्यांचा विचार आजही दिशादर्शक आहे.

**- प्रा. डॉ. शरद गायकवाड**

### फुलेंचा पोवाडा म्हणजे शिवचरित्रच

शिवचरित्राच्या अभ्यासाने प्रभावित झालेले महात्मा फुले १८६९ साली रायगडावर पोचले आणि तेथील छत्रपती शिवरायांची समाधी त्यांनी शोधून काढली. त्याच्याही पुढे जाऊन त्यांनी छत्रपती शिवरायांवर एक प्रदीर्घ पोवाडा लिहिला. अशिक्षित माणसालाही शिवाजी महाराजांचे चरित्र सहज समजेल, इतक्या सोप्या भाषेत त्यांनी तो लिहिला असून, तो अजूनही लिखित स्वरूपातच आहे. तत्कालीन विविध भाषांतील पुराव्यांचा अभ्यास करून त्यांनी मांडलेले हे शिवचरित्रच आहे. पोवाडा म्हणून तो आता विविध माध्यमातून सादर व्हायला हवा. त्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

**- शिवशाहीर राजू राऊत**

11 APR 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, को

# पंजाबराव देशमुख यांच्या जीवनावर संशोधनाची गरज

## वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे संचालक शिवाजीराव देशमुख यांचे प्रतिपादन : फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाचे उद्‌घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

कृषीमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या विचारकार्याविषयी सखोल संशोधन व चिंतन होण्याची गरज आहे, अशी अपेक्षा पुणे येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे संचालक तथा माजी कृषी व फलोत्पादन सचिव शिवाजीराव देशमुख यांनी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्यावतीने फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. 'भारतातील शेतीच्या समस्या' हा परिसंवादाचा विषय होता. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होती.



**कोल्हापूर : परिसंवादामध्ये बोलताना वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे संचालक शिवाजीराव देश-मुख. सोबत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. श्रीकृष्ण महाजन आदी.**

यावेळी देशमुख म्हणाले, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यावर राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारांचा पगडा होता. १९१७ साली खामगाव येथे झालेल्या परिषदेत शाहू महाराजांचे विचार त्यांनी ऐकले होते. तेव्हापासून त्यांच्या विचाराचा वारसा त्यांनी आयुष्यभर जपला. अमरावतीत शिवाजी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक कार्यास प्रारंभ केला. शेतकऱ्यांच्या हिताची काळजी वाहणाऱ्या भारत कृषक समाजाची स्थापनाही त्यांनी केली. शाहू महाराजांच्या विचाराप्रमाणे पंजाबराव देशमुख यांचे विचार होते. मजुरांची अनुपलब्धता, खते, बियाणे आदींच्या बाबतीत शेतकऱ्यांची होणारी फसवणूक न परवडणारी आहे. जिरायती शेती आणि राज्याचा अवर्षण असणारा ४० टक्के भूभाग महाराष्ट्रातील शेतीसमोरील सर्वसाधारण समस्या आहेत. त्यासाठी उपलब्ध पाणी योग्य प्रकारे साठवून त्याचा नियोजनबद्ध वापर केला. केवळ शेतीवरील अवलंबित्व कमी करून शेतीपूरक अथवा अन्य व्यवसायांची त्याला जोड देणे, तरुणांमधील आणि विशेषतः तरुणींमधील शेतीविषयक अनास्था दूर करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, हवामान बदल आणि जागतिक तापमानवाढ यांच्यामुळे समग्र पर्यावरण बदलून गेले आहे. त्याचा शेतीसह मानवाच्या जीवनमानावर विपरित परिणाम होतोय. ज्ञानाच्या आधारे शाश्वत विकास आणि फिरते अर्थकारण यांचा जास्तीत जास्त वापर केला पाहिजे.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. आंबेडकर केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दीपा श्रावस्ती यांनी आभार मानले. यावेळी कर्नाटक विद्यापीठाचे अर्थतज्ज्ञ डॉ. एस. टी. बागलकोटी, डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. नितीन माळी, समाजशास्त्रज्ञ डी. श्रीकांत, वसंत लिंगनूरकर, आनंद खामकर आदी उपस्थित होते.